**आकाशवाणी नागपूर,**

**प्रादेशिक वृत्त विभाग**

**प्रादेशिक बातम्या (मराठी-वेळ सायंकाळी ०६.००)**

**गुरुवार दिनांक २३ जानेवारी २०२५**

**ठळक बातम्या**

1. नेताजी सुभाषचंद्र बोस यांच्या १२८व्या जयंतीनिमित्त, तसंच शिवसेनाप्रमुख बाळासाहेब ठाकरे यांच्या जयंतीनिमित्त राज्यात विविध कार्यक्रम.
2. दावोस जागतिक परिषदेत राज्याने दोन दिवसांत केले १५ लाख ७० हजार कोटी रुपयांचे ५४ सामंजस्य करार, विदर्भाच्या विकासावर लक्ष केंद्रीत करून ८ हजार ७६० प्रत्यक्ष आणि अप्रत्यक्ष रोजगार निर्मिती करण्याचा उद्देश.
3. नागपुरातील, दीक्षाभूमी, ताजबाग याशिवाय रामटेक आणि इतर धार्मिक स्थळं यांच्या विकासाबाबत लवकरच बैठका घेऊन उपाययोजना करणार - पालकमंत्री बावनकुळे यांची माहिती.
4. शालेय शिक्षण राज्यमंत्री भोयर घेणार नागपूर विभागातील परीक्षेचा आढावा, कॉपी मुक्त अभियान प्रभावी राबविण्यासाठी राज्यमंत्र्यांचा पुढाकार.

-----------------------

**सुभाषचंद्र बोस आणि बाळासाहेब ठाकरे अभिवादन**

नेताजी सुभाषचंद्र बोस यांच्या १२८ व्या जयंतीनिमित्त राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू, उपराष्ट्रपती जगदीप धनखड आणि पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी त्यांना आदरांजली अर्पण केली. नेताजींचा जन्मदिवस पराक्रम दिवस म्हणून साजरा केला जात आहे. नेताजी स्वातंत्र्यलढ्यातील सर्वात प्रेरणादायी नेत्यांपैकी एक होते, असं राष्ट्रपतींनी आपल्या संदेशात म्हटलं आहे. नेताजींचं समर्पण आणि आझाद हिंद फौजेची निर्मिती हा त्यांच्या शौर्याचा पुरावा आहे असं उपराष्ट्रपती जगदीप धनखड म्हणाले. तर नेताजी सुभाषचंद्र बोस यांचं स्वातंत्रलढ्यातील योगदान अतुलनीय आहे, असं पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी सांगितलं. संविधान सदनाच्या सेंट्रल हॉलमध्ये पंतप्रधानानी नेताजी सुभाषचंद्र बोस यांच्या प्रतिमेला अभिवादन केलं. लोकसभेचे सभापती ओम बिर्ला, संरक्षण मंत्री राजनाथ सिंह, राज्यसभेचे विरोधी पक्षनेते मल्लिकार्जुन खर्गे यांनीही नेताजी सुभाषचंद्र बोस यांना आदरांजली वाहिली. दरम्यान, सांस्कृतिक मंत्रालयानं नेताजींच्या जन्मस्थानी ओडिशातल्या कटक इथं तीन दिवसांचा उत्सव आयोजित केला आहे. शिवसेनेचे संस्थापक बाळासाहेब ठाकरे यांच्या जयंतीनिमित्त पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी आदरांजली अर्पण केली. बाळासाहेब ठाकरे त्यांच्या लोककल्याण आणि महाराष्ट्राच्या विकासासाठीच्या

वचनबद्धतेबद्दल ओळखले जातात, असं पंतप्रधान म्हणाले. राज्यपाल सी.पी.राधाकृष्णन यांनीही नेताजी सुभाषचंद्र बोस आणि बाळासाहेब ठाकरे यांना जयंतीनिमित्त राजभवन इथं आदरांजली वाहिली. मुंबई इथं मंत्रालयात पाणीपुरवठा आणि स्वच्छता मंत्री गुलाबराव पाटील यांनी नेताजी सुभाषचंद्र बोस आणि बाळासाहेब ठाकरे यांच्या प्रतिमेला फुलं वाहून अभिवादन केलं. नागपुरात विविध सरकारी आणि खाजगी आस्थापणांसह महावितरणतर्फ़े देखील अभिवादन करण्यात आले.

------------------------

दावोस परिषद करार

स्वित्झर्लंडमध्ये दावोस इथं सुरू असलेल्या जागतिक आर्थिक मंचाच्या वार्षिक परिषदेत गेल्या दोन दिवसांत राज्यात १५ लाख ७० हजार कोटी रुपयांची गुंतवणूक आणणाऱ्या ५४ सामंजस्य करारांवर स्वाक्षऱ्या झाल्या. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी काल विविध उद्योगसमूहांशी बैठका घेतल्या. या करारांमुळं अंदाजे १६ लाख रोजगार निर्मितीची अपेक्षा आहे. त्यापैकी एक महत्त्वाचा करार एमएसएन होल्डिंग्ज लिमिटेडसोबत झाला असून, त्यात राज्याच्या 'अल्ट्रा मेगा प्रोजेक्ट' उपक्रमांतर्गतच्या प्रगत लिथियम बॅटरी आणि सेल उत्पादन प्रकल्प स्थापन करण्याच्या योजनेचा समावेश आहे.यामुळे विदर्भाच्या विकासावर लक्ष केंद्रीत करून ८ हजार ७६० प्रत्यक्ष आणि अप्रत्यक्ष रोजगार निर्मिती करण्याचा उद्देश आहे. गडचिरोलीतही गुंतवणुक होत असल्याची माहिती मुख्यमंत्र्यांनी या परिषदे दरम्यान दिली आहे.

*गडचिरोली अब हॉट डेस्टिनेशन हो गया है। मतलब जो शायद कुछ साल पहले तक एक प्रकार से नक्सल अफेक्टेड एरिया करके जाना जाता था। It is becoming new steel city of India. अभी हम लोगों ने महाराष्ट्र का 30% स्टील कैपेसिटी वहाँ पर तैयार कर लिया है या तैयार हो रही है, जिसका काम शुरू है अभी उतनाहीऔर निवेश या उतनी है और कैपेसिटी हम लोगों ने जो एमओयू अभी साइन किये हैं उसके कारण तैयार होने वाला तो एक प्रकार से मैं ऐसा मानता हूँ कि स्टील के क्षेत्र में एक क्रांति एक गडचिरोली में हो रही है।*

इतर करारामध्ये ऑटोमोबाईल आणि क्षेत्रात सिएट सोबत नागपूरसाठी 500 कोटींचा करार करण्यात आला असून, त्यातून 500 इतकी रोजगार निर्मिती होणार आहे. तर वर्धान लिथियम सोबत 42 हजार 535 कोटीची गुंतवणूक करण्याचा करार झाला असून यातून 5000 इतकी रोजगार निर्मिती होणार आहे. हा प्रकल्प नागपुरात साकारणार आहे. याशिवाय आणि संरक्षण क्षेत्रात इकॉनोमिक एक्सप्लोसिव्ह लिमिटेड 12 हजार 780 कोटी रुपयांची गुंतवणूक करणार असून हा

प्रकल्प देखील नागपुरात साकार होणार आहे. यातून 2हजार 325 रोजगार निर्मिती होण्याची अपेक्षा आहे. तसेच संरक्षण क्षेत्रात एमएसएन होल्डिंग लिमिटेड ही कंपनी गुंतवणूक करणार असून 14हजार 652 कोटी रुपयांची गुंतवणूक अपेक्षित असून यातून 8हजार 760 रोजगार निर्मिती होणार आहे. याशिवाय हेजेरो इंडस्ट्रीज नागपूरच्या बुटीबोरी भागात गुंतवणूक करणार असून ही कंपनी हरित ऊर्जा क्षेत्रात 16 हजार कोटींचे दोन प्रकल्प आणणार आहे. यातून दहा हजार इतकी रोजगार निर्मिती होण्याची अपेक्षा आहे.

------------------------

**संविधान गौरव अभियान सभा**

संविधानाचा गौरव करण्यासाठी भारतीय जनता पक्षाच्या वतीने आज नागपुरातील महाल स्थित संविधान गौरव अभियान सभेचे आयोजन आज करण्यात आले होते. या सभेत केंद्रिय मंत्री नितीन गडकरी, राज्य अनुसुचित जाती जमाती आयोगाचे उपाध्यक्ष धर्मपाल मेश्राम, राष्ट्रिय अनुसुचित जाती आयोगाचे माजी सदस्य सुभाष पारधी यांच्यासह अनेक मान्यवर उपस्थित होते. याप्रसंगी बोलतांना गडकरींनी संविधानाचा मुळ ढाचा हा कुणीही आणि कोणतेही सरकार बदलू शकत नाहीत असे स्पष्ट केले..

*मूलभूत तत्व जे आहे फंडामेंटल राइट्स फ्रीडम ऑफ स्पीच जे काही यात आपल्याला दिल्या गेलेले जसा 1973 च्या केसा उल्लेख डॉक्टर खोब्रागडे साहेबांनी केला केरळ वर्सेस सुप्रीम कोर्ट 13 न्यायमूर्ती होते, खंडपीठ होते, सुप्रीम कोर्टाचे चीफ जस्टीस पण होते आणि त्यांनी एक ऐतिहासिक निर्णय दिला, की सायलेंट फीचर्स ऑफ द कॉन्स्टिट्यूशन कॅनॉट बी चेन्जडं म्हणजे लोकतंत्र, समाजमान, धर्मनिरपेक्षता, फंडामेंटल राइट्स हे मूलभूत तत्वाच्या आधारावर जेवढ्या काही गोष्टी आहेत त्याला कोणतेही सरकार आलं तरी ते बदलू शकत नाही, त्यामुळे मूलभूत तत्व बदलण्याचा अधिकार काँग्रेसला नाही, मूलभूत तत्व कधीही बदलू शकत नाही.*

लोकशाही मध्ये यशस्वी व्हायचे असेल तर संवेदनशिल बनून लोकांना अधिकाधिक मदत केली पाहिजे असेही गडकरी यांनी सांगितले. यावेळी गडकरी यांच्या उपस्थितीत सर्व नागरिकांनी संविधान प्रास्ताविकेचे वाचनही केले.

------------------------

**संविधान मॅरेथॉन**

संविधान मॅरेथॉनचं आयोजन संविधानाच्या अमृत महोत्सवा प्रसंगी 26 जानेवारी रविवार सकाळी 6 वाजता जरीपटका येथील भीम चौकातूनउत्तर नागपूरचे आमदार

डॉक्टर नितीन राऊत यांच्या नेतृत्वात केला जाणार असून या मॅरोथॉनच समारोप सुमारे साडेतीन किलोमीटरचे अंतर कापल्यानंतर कामठीच्या यादव चौकात या मॅरोथोनचा समारोप होईल.

-----------------------

बावनकुळे

नागपुरातील, दीक्षाभूमी, ताजबाग याशिवाय रामटेक आणि इतर धार्मिक स्थळं यांच्या विकासाबाबत आपण लवकरच बैठका घेऊन उपाययोजना करणार असल्याचे राज्याचे महसूल मंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांनी नागपुरात सांगितलं. आज नागपूरच्या प्रेस क्लब तर्फे त्यांचा महसूल मंत्री आणि नागपूर आणि अमरावतीच्या पालक मंत्रीपदाचा पदभार स्वीकारल्या बद्दल अभिनंदन करण्यात आले त्यावेळी ते बोलत होते. दरम्यान नागपूर प्रेस क्लबच्या विकासासाठी देखील आर्किटेक शोधावा आणि आगामी विभागीय आयुक्तांसोबत होणाऱ्या बैठकीत चर्चा करून प्रेसक्लबचा विकास केला जाईल असे आश्वासन त्यांनी दिले. अमरावती आणि नागपूरच्या पत्रकारांसाठी निवासस्थानाची व्यवस्था केली जाईल त्यासाठी जागा शोधली असून त्या प्रकल्पावर देखील काम करण्यात येणार आहे. लवकरात लवकर आम्ही पत्रकारांसाठी चांगल्या दर्जाच्या निवासस्थान बांधण्याचा निर्णय करणार आहोत अशी माहिती देखील त्यांनी दिली. म्हाडाच्या माध्यमातून त्या बाबतची बैठक विभागीय आयुक्तांकडे घेतली जाईल असे त्यांनी सांगितले दिली. हॉकर्स द्वारे फुटपाथ अतिक्रमण आणि वाढते अपघात यावर त्यांनी भाष्य केलं -

*नागपूर मे जिस प्रकार से अतिक्रमण हुए है, सारे फूटपाथ सारे रास्ते, एक्सीडेंट के स्पॉट बन चुके है, और एक्सीडेंट स्पॉट को प्रोटेक्ट करना ठीक नही है, एक्सीडेंट स्पॉट को रिमुव्ह करना चाहिए,एक आदमी के भी जान गयी तो कोई ला नही सकता, हॉकर्स दुकान लगा सकते है, उनको कही और सेटल कर सकते है ,इसलिये मे इसमे कलेक्टर के पास मीटिंग लेने वाला हू, की हॉकर्स झोन कहा रहे, हॉकर्स के दुकान कहा हो. हमारे पास बहुत जगा है.*

दरम्यान,ज्या व्यक्तीच्या पक्षप्रवेशाने पक्षाची प्रतिमा खराब होईल अशा व्यक्तीला पक्षप्रवेश देणार नाही तसेच कुठलाही पक्षप्रवेश करताना तिन्ही महायुतीच्या घटक पक्षांशी चर्चा करूनच हा पक्षप्रवेश केला जाईल असं बावनकुळे यांनी स्पष्ट केलं.

-----------------------

डॉ.पंकज भोयर

राज्याचे शालेय शिक्षण राज्यमंत्री तथा वर्धा जिल्हयाचे पालकमंत्री डॉ.पंकज भोयर परवा 25 जानेवारी रोजी नागपूर विभागातील 10 वी आणि 12 वी परीक्षेचा

आढावा घेणार आहे. कॉपीमुक्त अभियान प्रभावीपणे राबविण्यासंदर्भात आवश्यक त्या सूचना देऊन केलेल्या तयारीची माहिती घेणार आहे. परीक्षेसंदर्भात वर्धा जिल्हाधिकारी कार्यालयातील नियोजन विभागाचे सभागृहात 25 जानेवारीला सकाळी 10.30 वाजता राज्यमंत्री भोयर यांच्या अध्यक्षतेखाली कार्यशाळेचे आयोजन करण्यात आले आहे.परीक्षेमध्ये कोणत्याही प्रकारचा गैरप्रकार होऊ नये यासाठी विशेष अभियान शासनाने सुरू केले आहे. येत्या 11 फेब्रुवारी पासून 12 वी तर 21 फेब्रुवारी पासून 10 वी ची परीक्षा प्रारंभ होत असून या परीक्षेसाठी नागपूर विभागातून 3 लाख 9 हजार 916 विद्यार्थी परीक्षेस बसले आहे. परीक्षेदरम्यान गैरप्रकार टाळणे, विद्यार्थ्यांना आवश्यक त्या सोयीसुविधा, कॉपी रोखण्यासाठी करण्यात आलेल्या उपाययोजनांची माहिती डॉ. पंकज भोयर घेणार आहेत.

------------------------

महावितरण

एखाद्या घराची, जागेची मालकी बदलली तरी पूर्वीच्या वीजबिलांच्या थकबाकीची वसुली करण्याचा अधिकार वीजवितरण कंपन्यांना असल्याचा निकाल सर्वोच्च न्यायालयाने दिलेला आहे. त्यामुळेच जुनी जागा, फ्लॅट, घर घेताना सावध रहा. त्याचे वीजबिल तपासा अस आवाहन महावितरणने ग्राहकांना केले आहे. जागेच्या व्यवहारात वीजबिलाची थकबाकी वसूल केल्याशिवाय नवीन वीजजोडणी देण्यास नकार देण्याचे अधिकार वीजवितरण कंपन्यांना आहेत. असे देखील स्पष्ट करण्यात आले.

------------------------